# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## गिरणी कामगार सदनिका सोडत - २०१६

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बंद / आजारी गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना घरे देण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने म्हाडा मार्फत गिरणी कामगारांची माहिती संकलीत करण्यात आली. सदरच्या यादीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. त्या अनुषंगाने खालील नमुद एकुण ६ गिरण्यांच्या, गिरणी कामगारांच्या सदनिकांची संगणकीय सोडत **दि.०९/०५/२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता स्थळ - रंगशारदा सभागृह, के.सी.मार्ग, वांद्रे रिक्लेमेशन, वांद्रे (पश्चिम),मुंबई-४०००५० येथे** काढण्यात येणार असुन त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संकेत क्र. | गिरणींचे नाव | सोडतीसाठी उपलब्ध सदनिकेची संख्या | संकेत स्थळावर उपलब्ध अर्जाची संख्या | सदनिकेचे क्षेत्रफळ (चटई) चौ.फुटात | सदनिकेची विक्री किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | भारत मिल | १८८ | १७१२ | २२५ | ९.५० लक्ष |
| २ | २६ | वेस्टर्न इंडिया मिल | २५० | १८७१ | २२५ | ९.५० लक्ष |
| ३ | ३० | सेंच्युरी मिल | १४३० | १०८४३ | २२५ | ९.५० लक्ष |
| ४ | ४८ | प्रकाश कॉटन मिल | ५६२ | २७८७ | २२५ | ९.५० लक्ष |
| ५ | ५० | रुबी मिल | ४७ | ११८१ | २२५ | ९.५० लक्ष |
| ६ | ५७ बी | स्वान मिल ज्युबिली | १५७ | ३०९ | २२५ | ९.५० लक्ष |
| **एकुण** | | | **२६३४** | **१८७०३** | | |

उपरोल्लेखित गिरण्यांच्या सदनिकाकरीता त्याच गिरण्यांमधील कामगारांमधुन सोडत काढण्यात येणार असून, ६ गिरण्यांमधील गिरणी कामगार / मयत कामगारांच्या वारसांची प्राप्त माहिती म्हाडाचे संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

१) सोडतीचा दिनांक, वेळ व ठिकाण
- सोडत दिनांक ०९/०५/२०१६ सकाळी १०.०० वाजता
- सोडतीचे स्थळ - **रंगशारदा सभागृह, के.सी.मार्ग, वांद्रे रिक्लेमेशन, वांद्रे (प), मुंबई-४०००५०**

२) **सोडतीच्या अटी व शर्ती**

I) म्हाडा संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिद्ध करण्यात आलेल्या ६ गिरण्यांच्या गिरणी कामगारांच्या माहिती प्रमाणेच अर्जदारांची सोडत काढण्यात येईल.

II) शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या आदेश / निर्देशानुसारच सोडत, पात्रता निश्चिती व सदनिका वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

III) ज्या गिरणी कामगाराने ज्या गिरणी संकेत क्रमांकाची माहिती दिलेली आहे, त्याच संकेत क्रमांकासाठी अर्जदाराची सोडत काढण्यात येईल.

IV) गिरणी कामगार पती / पत्नी / वारस यापैकी मूळ गिरणी कामगार अथवा त्यांच्या वारसांचा एकाच सदनिकेसाठी विचार करण्यात येईल. एकापेक्षा जास्त अर्जाचा वितरणासाठी विचार केला जाणार नाही.

**V) संगणकीय सोडतीमध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. या करीता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनास बळी पडु नये. त्याकरीता म्हाडा जबाबदार राहणार नाही.**

**VI) सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार अथवा प्रॉपर्टी एजन्ट म्हणुन नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास मुंबई मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**

VII) सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांची पात्रता निश्चित झाल्यानंतरच सदनिकेची किंमत / मुद्रांक शुल्क / सेवाशुल्क, इत्यादी अर्जदारास भरणे बंधनकारक राहील.

VIII) गिरणी कामगाराच्या संबधात मा.न्यायालयात दाखल झालेल्या / भविष्यात दाखल होणा-या कोणत्याही याचिकेतील निर्णय सर्व अर्जदारांस बंधनकारक राहील.

IX) जाहिरातीच्या व सोडतीच्या अनुषंगाने म्हाडाकडुन / शासनाकडुन काही नवीन सुचना प्राप्त झाल्यास तसे म्हाडाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

X) जाहिरातीमध्ये अनावधानाने झालेल्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

XI) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने होणा-या बदलाचे अधिकार मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहे.

टिप :- सर्व संबधितांस आवाहन करण्यात येते की, अर्ज भरलेल्या पावतीची पोच व ओळखपत्रासह सोडतीच्या दिवशी उपस्थित रहावे. सभागृहात उपलब्ध आसन व्यवस्थेनुसारच प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या धरतीवर प्रवेश देण्यात येईल.

**<u>अधिक माहितीसाठी संपर्क</u>**
"म्हाडा लॉटरी केंद्र "
मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५ जवळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पु), मुंबई-५१
हेल्प लाईन नं.- ९८६९९८८०००
(०२२-२६५९८९२१ ते २४)
०२२-२६५९२६९२/९३
म्हाडा संकेतस्थळ- https://mhada.maharashtra.gov.in/?q=millworkers_lottery

(सुभाष लाखे)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई